संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२४-७६०२
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-३५२५२३४६/३४७/३४८/३४९/३५०,
E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in
दिनांक : - ०६.०८.२०२४

# आ दे श

विषय :- सुरक्षा रक्षक मंडळ मुख्य मालकांच्या वतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात नोंदीत झाल्यामुळे मुख्य मालक अंशदानाकरीता मंडळामार्फत आकारण्यात येणाऱ्या मुळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता वरील लेव्हीमध्ये ०.१०% वाढ करण्याबाबत तसेच सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यांमध्ये दि.१.७.२०२४ पासून करण्यांत येणारी सुधारणा व राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (W.C.) च्या तरतुदी लागू करण्याबाबत.

मंडळातील नोंदीत व कार्यरत सुरक्षा रक्षकांचे हित व कायदेशीर तरतूद लक्षात घेऊन, मंडळाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात मुख्य मालकाच्या वतीने नोंदीत होण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्या अनुषंगाने मुख्य मालक प्रति कामगार अंशदानाकरिता मंडळामार्फत आकारण्यात येणाऱ्या मूळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता वरील लेव्हीमध्ये ०.१०% वाढ करण्याबाबत निर्णय घेऊन दिनांक ८.०८.२०२४ रोजीचा ठराव पारित केलेला आहे. सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२४-१२०९, दि.५.२.२०२४ च्या आदेशान्वये दि.१ जानेवारी,२०२४ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२४(२)/कार्या-१०, दि.६.८.२०२४, अन्वये दि.१ जुलै २०२४ ते दि.३१ डिसेंबर २०२४ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.३,२५०.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ६.८.२०२४ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जुलै २०२४, ते दि.३१ डिसेंबर २०२४ या कालावधीकरीतां रु.३,२५०.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०२३-२४६७, दि.१६ मे, २०२३ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

मंडळामार्फत कार्यरत सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी हे राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेऊन मंडळाने उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां कामगार भरपाई अधिनियम, १९२३ ची योजना लागू करण्याचा निर्णय घेऊन दि.२.८.२०२३ रोजी ठराव पारित केलेला आहे. सबब, कामगार राज्य विमा योजनेकरीतां उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां आकारण्यांत येणारी किमान वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता), घरभाडे भत्ता, अतिकालीक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता यावरील आकारण्यांत येणारी ३.२५% लेव्ही कमी करण्यांत आली असून कामगार भरपाई अधिनियम, १९२३ योजनेकरीतां किमान वेतनाच्या १ टक्का लेव्ही आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर लेव्हीमधील बदल मंडळाच्या ERP प्रणालीत करण्यांत आलेले आहेत.

**सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक, मुख्य सुरक्षा रक्षक यांना दि.१.७.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंत लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.३५ %) रुपये | लेव्ही ह (घरभाडे, रजाकाली न प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ म.सु.रक्षक | १३,४५७.०० | ३,२५०.०० | ३,३४१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,५४८.०० | ७,५७७.०० | ११२.०० | ३१,२३७.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | ३,२५०.०० | ३,३९६.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,८७८.०० | ७,७०१.०० | ११४.०० | ३१,६९३.०० |

..२

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.३५% दराने व घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

**सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना दि.१.७.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंत लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ.क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४३.१०%) रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | ३,२५०.०० | ३,५३६.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,७१८.०० | ७,६२१.०० | ३२,३३९.०० |
| २ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | ३,२५०.०० | ३,५८१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,९८८.०० | ७,७१८.०० | ३२,७०६.०० |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | ३,२५०.०० | ३,६७१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,५२८.०० | ७,९१२.०० | ३३,४४०.०० |
| ४ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | ३,२५०.०० | ३,७६१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २६,०६८.०० | ८,१०६.०० | ३४,१७४.०० |

* <u>किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता</u>

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४३.१०% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दि.१.७.२०२४ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

Security Guards Board for Br. Bombay & Thane District, Sanpada, Navi Mumbai

सही/-
(अशोक ल. डोके)
कामगार उप आयुक्त व
अध्यक्ष
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
मे. हिन्दुस्तान सिक्युरिटी फोर्स, नों.क्र. — ......, युनिट क्र. — ......
HINDUSTAN SECURITY FORCE
31-A, 1FLOOR, SAGAR SAMRAT,
OPP. CHARNI ROAD RAILWAY STATION
M. K. ROAD (EAST), MUMBAI-400004

**This being a computerised printed copy, signature is not required.*